I.O. प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड
**P.S.(ठाणे):** विमानतळ
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0116
**Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/03/2023 02:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 7
**Date From (दिनांक पासून):** 30/03/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 30/03/2023
**Time From (वेळेपासून):** 19:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 20:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 31/03/2023
**Time (वेळ):** 02:48 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 007
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/03/2023 02:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पोस्टे विमानतळ चे ईमारतीत,नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पोलीस स्टेशन, विमानतळ 1 नांदेड

Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ज्ञानेश्वर गणेश सुर्यवंशी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नवीन बायपास रोड, शिव नगर,नांदेड ,विमानतळ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राधाकिशन नगर, किनवट रोड, भोकर, ता भोकर,भोकर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7776086626

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अशोक रामराव कुरूळेकर | | | 1. पो स्टे विमानतळ नांदेड , विमानतळ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 30/03/2023

मी ज्ञानेश्वर गणेश सुर्यवंशी, वय 30 वर्षे, व्यवसाय खाजगी ड्रायवर, रा. राधाकिशन नगर, किनवट रोड, भोकर, ता. भोकर, ह.मु. नवीन बायपास रोड, शिव नगर, नांदेड, मो.नं. 7776086626

पोलीस स्टेशन विमानतळ येथे समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन दिनांक 30/03/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथील पोलीस निरीक्षक श्री नाईक यांचेकडे तक्रार दिली होती की, मी जानेवारी/2023 मध्ये माझा मित्र बजरंग व त्याची मैत्रिण पुजा जाधव यांना घेवून भोकर येथे गेलो होतो. आम्ही एक दिवस भोकर येथे थांबलो दुस-या दिवशी पुजा ही भोकर येथून एस.टी. ने नांदेड ला जाते असे सांगुन निघून गेली होती. त्यानंतर विमानतळ पोलीस स्टेशन येथे ती मिसींग असले बाबत मिसींग नोंद झाली होती. विमानतळ पोलीस स्टेशनचे पोलीस कुरूळेकर साहेब यांनी मला जानेवारी 2023 च्या पहिल्या आठवडयात फोन करून विमानतळ पोलीस स्टेशन येथे बोलावून घेतले व त्यांनी मला विचारणा केली की, पुजा जाधव कुठे आहे, त्यावेळी मी त्यांना सांगितले की, दोन दिवसापुर्वी माझा मित्र व पुजा यांच्यासोबत मी ड्रायवर म्हणून भोकर येथे गेलो होतो. दुस-या दिवशी पुजा ही भोकर वरून एस.टी.ने नांदेडला जाते असे म्हणून निघून गेली. त्यानंतर ती कुठे आहे याबाबत मला माहिती नाही. त्यानंतर कुरूळेकर साहेब यांनी माझा मोबाईल व आधारकार्ड मिसींगच्या तपासामध्ये जमा करून घेतले. दोन दिवसांनंतर पुजा ही मिळून आली म्हणून मी माझा फोन व आधारकार्ड परत घेण्यासाठी विमानतळ पोलीस स्टेशनला गेलो. तेथे कुरूळेकर साहेब यांनी मला माझा मोबाईल फोन व आधार कार्ड परत देण्यासाठी एक हजार रूपये पैशाची मागणी केली. कुरूळेकर साहेब हे मागत असलेले एक हजार रूपये हे लाच असल्याने, ती देण्याची माझी ईच्छा नाही. त्यांनी लाच मागणी करून स्विकारल्यास त्यांच्यावर कायदेषीर कार्यवाही करावी म्हणून मी दिनांक 30/03/2023 रोजी दुपारी 01.00 वा सुमारास ला.प्र.वि विभाग नांदेड. कार्यालयात हजर राहुन त्यांचे विरूध्द तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारी वरून पोलीस निरीक्षक जमीर नाईक यांनी लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला सदर लाचमागणी पडताळणी कामी आजच तात्काळ दि. 30/03/2023 रोजी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले. दोन शासकीय पंचापैकी पंच क्र 1 श्री संजयसिंह बहादुरसिंह ठाकुर, व पंच क्रं. 2 श्री अनंत कृष्णाजी सवाई यांचा व माझा परिचय करून दिला. तसेच सापळा पथकातील अमंलदार पोना/राजेश राठोड, पोकाँ/रितेश कुलथे, पोकाँ/अरशद खान व चालक पोना/प्रकाश मामुलवार यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोनि श्री नाईक यांच्या सुचनेवरून मी माझी तोंडी तक्रार पंचाना सांगितली. त्यानंतर पोनि श्री नाईक यांनी मी दिलेली लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. पंचानी मी तोंडी सांगितलेली व लेखी दिलेली तक्रार एकसारखीच असल्याची खात्री केली. त्यानंतर त्याठिकाणी पोकाँ/रितेष कुलथे यांनी एक नवीन मेमरी कार्ड डिजीटल व्हाईस रेकाँर्डर मध्ये टाकुन पोलीस निरीक्षक जमीर नाईक, माझे व दोन्ही पंचाचे परिचय दर्शक वक्तव्य रेकाँर्डींग करून घेतले.

त्यानंतर पोलीस कुरूळेकर साहेब यांची भेट घेवून लाच पडताळणी करणेकामी पोनि जमीर नाईक यांनी लाचमागणी पडताळणी अनुषंगाने मला व पंचाना सुचना दिल्या. पोलीस कुरूळेकर साहेब यांची भेट घेण्यासाठी जागा निश्चीत करणेकामी दुपारी अंदाजे 04.15 वाजण्याचे सुमारास माझे मोबाईल क्रमांक 7776086626 वरून पोलीस कुरूळेकर साहेब यांचे मोबाईल क्रमांक 9923696704 वर फोन लावून माझे नाव सांगुन त्यांना माझा मोबाईल व आधार कार्ड परत करणे बाबत विनंती केली असता, त्यांनी मी सध्या बंदोबस्तात आहे, संध्याकाळी साडे सात, आठ वाजता विमानतळ पोलीस स्टेशनला येण्यास सांगितले. मी केलेला काँल पोनि श्री जमीर नाईक यांच्या सुचनेवरून पोकाँ/कुलथे यांनी डिजीटल व्हाईस रेकाँर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करून घेतला. त्यानंतर संध्याकाळी 07.00 वाजण्याचे सुमारास मी, पंच, पोनि नाईक साहेब व त्यांचे स्टाफ असे वेगवेगळया मोटार सायकलवर बसून ए.सी.बी. ऑफीस, नांदेड येथून निघून स्वातंत्र सैनिक काँलनी, शोभा नगर, नांदेड येथील म.न.पा. पाण्याचे



Scanned with CamScanner

टाकीजवळ निर्जनस्थळी जावून थांबलो. त्याठिकाणी मला पोनि नाईक साहेब यांनी सविस्तर सुचना देवून पोकाँ/कुलथे यांनी माझे गळयात डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच क्र. 1 यांच्याकडील मोटार सायकल वरून पोलीस स्टेशन विमानतळ येथे लाचमागणी पडताळणी कामी 07.30 वाजण्याचे सुमारास पाण्याचे टाकीजवळ थांबलेले ठिकाण पासुन रवाना केले व सदर सापळा पथक हे सदर ठिकाणी थांबून राहिले.

त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे पोलीस स्टेशन विमानतळ येथे गेलो असता. त्याठिकाणी पोलीस कुरूळेकर साहेब दिसले नाही म्हणून त्यांना त्यांचे मोबाईलवर कॉल केला असता, त्यांनी मी पाच मिनीटात यायलो असे सांगितले. त्यानंतर ते थोडया वेळात त्याठिकाणी आले. तेव्हा मी त्यांना साहेब माझा मोबाईल व आधार कार्ड परत दया, मला भाडा घेवून पोहरादेवी येथे जायचे आहे असे सांगितले. तेव्हा त्यांनी मला किती करतूस, किती करतूस तू असे म्हणाले, तेव्हा मी त्यांना म्हणालो की, मी गरिब आहे सर, काही तरी कमी करा, मला डिझेलचे सातशे, आठशे रूपये येणार आहेत, असे म्हणालो असता, पोलीस श्री कुरूळेकर साहेब यांनी मला हजार रूपये तर दे, कमीत कमी असे म्हणून मला लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना 15 ते 20 मिनीटांत पाण्याचे टाकीजवळील बोळीमधून मला पोहरादेवीचे भाडयाचे गाडीमध्ये डिझेल टाकण्यासाठी सात, आठशे रूपये मिळणार आहेत ते मी आणून देतो असे म्हणून मी व पंच क्र.1 हे पोलीस स्टेशन विमानतळ येथून सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 08.00 वाजण्याचे सुमारास परत आलो. तेव्हा पोकाँ/कुलथे यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केले. पोलीस निरीक्षक नाईक यांनी पंच क्र.1 श्री संजयसिंह ठाकुर व माझ्या कडून लाचमागणी पडताळणी दरम्याण घडलेल्या हकीकतची माहिती घेतली व त्यांनतर व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले व सदर लाचमागणी पडताळणी दरम्याण पोलीस श्री कुरूळेकर साहेब यांनी पंच क्र.1 संजयसिंह ठाकुर यांच्या समक्ष एक हजार रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले म्हणुन पोलीस श्री कुरूळेकर यांच्यावर सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर सापळा पुर्व कार्यवाही करण्यात आली. पोना/राजेष राठोड यांनी दोन पंच व मला अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले तसेच सापळा कार्यवाही अनुषंगाने पोलीस निरीक्षक नाईक यांनी सर्व सापळा पथकास, मला व पंचाना सविस्तर सुचना दिल्या. तसेच सापळा कार्यवाही दरम्यान सापळा पथकातील सदस्यांनी कोणी काय करावे याबाबत प्रत्येकाची जबाबदारी निश्चीत केली. तसेच मी सापळा कार्यवाही कामी जमा केलेल्या 1000/- रूपयाच्या रक्कमेत ज्यात 500/- रू. दराच्या 2 चलनी नोटा ज्यांचे क्रमांक पंच क्रंमाक 02 यांनी पोनि श्री नाईक साहेब यांच्या सुचनेवरून नोंदवून घेतले. त्यानंतर सदरील नोटांना पंचासमक्ष पोना/राजेश राठोड यांनी अँन्थ्रासीन पावडर लावुन सदरील नोटा पंचासमक्ष माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात काही नसल्याची खात्री करून त्याठिकाणी ठेवल्या. त्यानंतर पोनि श्री नाईक यांनी मला पोलीस श्री कुरूळेकर यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर माझे पॅन्टच्या खिशातील रूमाल काढून तोंड पुसून हातात ठेवणे बाबतचा ईशारा करण्यास समजावुन सांगीतले.

त्यांनतर पोलीस श्री कुरूळेकर साहेब यांची भेट घेवून लाच पडताळणी करणेकामी पोनि नाईक साहेब यांनी लाचमागणी पडताळणी अनुषंगाने मला व पंचाना सुचना दिल्या. त्यांनतर पोकाँ/कुलथे यांनी पोनि नाईक साहेब यांचे सुचनेवरुन डिजीटल व्हाँईस रेकाँर्डर मधील मेमरी कार्ड काढुन ते सिल करुन डिजीटल व्हाँईस रेकाँर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन ते चालु करुन माझे गळयात दोरीच्या साहयाने आडकवून शर्टच्या आत मध्ये टाकुन माझ्या सोबत पंच क्र.1 श्री संजयसिंह ठाकुर यांचे सह पोलीस श्री कुरूळेकर साहेब यांची भेट घेण्यासाठी पंच क्र. 1 यांच्या मोटार सायकल वरून पो.स्टे. विमानतळ साठी पथक थांबलेल्या ठिकाण पासुन अंदाजे रात्री 08.25 वाजण्याचे सुमारास रवाना केले व सदर सापळा पथक हे सदर ठिकाणी थांबून राहिले.

त्यानंतर मी व पंच क्र. 1 हे पोलीस श्री कुरूळेकर साहेब यांची भेट घेण्यासाठी अंदाजे रात्री 08.30 वाजण्याचे सुमारास पो.स्टे. विमानतळ येथे गेलो असता, पोलीस कुरूळेकर साहेब यांनी लई वेळ लावलास यायला, मी आलो होतो की, पाण्याचे टाकीजवळ कोणी नव्हते असे सांगितले. तेव्हा मी त्यांना तेथेच बाजुला बोळीत घर आहे, तेथे गेलो होतो असे सांगुन मी माझे पॅन्टच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम काढीत असतांना मला पोलीस श्री कुरूळेकर साहेब यांनी हाताने थांबण्याचा ईशारा केला व पंच क्र. 1 यांच्याकडे हात दाखवुन हे कोण आहे असे विचारले तेव्हा मी त्यांना माझा चुलत भाउ आहे, असे सांगितले. तेव्हा पोलीस श्री कुरूळेकर साहेब हे मला कुठे राहतो असे विचारले असता, पंच क्र. 1 यांनी भोकर असे सांगितले, तेव्हा पोलीस श्री कुरूळेकर साहेब यांनी मला ओळखतो का, असे म्हणून पंच क्र. 1 यांची जास्त चौकशी करू लागले. त्यानंतर पोलीस श्री कुरूळेकर साहेब यांनी मला तुझे पैसे लागत नाही, तु गरिब माणुस आहे, हे घे तुझा मोबाईल व आधार कार्ड असे म्हणून माझा मोबाईल व आधार कार्ड मला परत देवून टाकला. पोलीस श्री कुरूळेकर यांना माझेवर व माझेसोबत असलेले पंच क्र. 1 यांच्यावर संशय आल्याने त्यांनी माझेकडून लाचेचे पैसे न घेता माझा मोबाईल फोन व आधार कार्ड मला परत देवून



Scanned with CamScanner

टाकला . त्यानंतर मी व पंच क्र.1 हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी रात्री 09.00 वाजण्याचे सुमारास परत आलो. तेव्हा पोकाँ/कुलथे यांनी माझ्या गळयातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केले. पोलीस निरीक्षक श्री नाईक यांनी पंच क्र.1 श्री संजयसिंह ठाकुर व माझ्या कडून लाचमागणी पडताळणी दरम्याण घडलेल्या हकीकतची माहिती घेतली व त्यांनतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषन ऐकले व सदर सापळा कार्यवाही दरम्यान पोलीस श्री कुरूळेकर साहेब यांना माझेवर संशय आल्याने त्यांनी माझेकडून लाचेची रक्कम घेण्यास नकार दिला त्यामुळे पोनि श्री नाईक साहेब यांनी पोलीस श्री कुरूळेकर साहेब यांनी लाच मागणी पडताळणी दरम्यान पंच क्र.1 संजयसिंह ठाकुर यांच्यासमक्ष एक हजार रूपये लाचेची मागणी केली परंतू ती स्विकारली नाही परंतू लाच मागणी सुध्दा गुन्हा असल्याने पोनि श्री नाईक साहेब यांनी त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला.

पोलीस श्री कुरूळेकर साहेब यांना पोलीस स्टेशन विमानतळ येथून ताब्यात घेवून पोनि श्री नाईक साहेब यांनी पोलीस श्री कुरूळेकर साहेब यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव अशोक रामराव कुरूळेकर, वय 53 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद ए.एस.आय., पो.स्टे. विमानतळ, रा. लक्ष्मीनारायण नगर, तरोडा बु. नांदेड असे सांगितले.

तरी पोलीस कुरूळेकर साहेब यांच्याकडे पुजा जाधव हीच्या मिसींगच्या तपासात माझा मोबाईल फोन व आधार कार्ड हे ताब्यात घेतले होते ते मला परत करण्यासाठी पोलीस श्री कुरूळेकर साहेब हे जानेवारी/2023 च्या पहिल्या आठवडयात व फेब्रुवारी/2023 च्या शेवटच्या आठवडयात मला एक हजार रूपयेची मागणी करून आज दि. 30/03/2023 रोजी सायंकाळी 07.30 वा. ते 08.00 वाजण्याचे दरम्यान पोलीस स्टेशन विमानतळ येथे पंचासमक्ष मला एक हजार रूपये लाचेची मागणी करून, मी लाचेचे एक हजार रूपये देत असतांना माझेवर संशय आल्याने माझेकडून लाचेचे पैसे स्विकारले नाही. म्हणुन माझी ए.एस.आय. अशोक रामराव कुरूळेकर, नेमणूक पोलीस स्टेशन विमानतळ यांच्या विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

सदरची तक्रार माझे सांगण्याप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असून ते प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिली, ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

ही फिर्याद दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Sahebrao Dagdoba Narwade(I (Inspector)) / Pobn76688 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

ज्ञानेश्वर

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

APP N.R. Analdas

**Signature of Officer in-charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sahebrao Dagdoba I
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): Pobn76688



Scanned with CamScanner